# दिनांक ११/१०/२०१९ रोजी राष्ट्रीय आरोग्य अभियान कक्ष, आरोग्य भवन, मुंबई येथे आयोजीत केलेल्या राज्य गुणवत्ता आश्वासन उपसमितीच्या बैठकीचे इतिवृत्त

कुटुंब कल्याण शस्त्रक्रिया संदर्भात दिनांक ११ ऑक्टोबर २०१९ रोजी मा. डॉ. अनूप कुमार यादव, आयुक्त, आरोग्य सेवा तथा अभियान संचालक, राष्ट्रीय आरोग्य अभियान, मुंबई यांचे अध्यक्षतेखाली तीसरा मजला, आरोग्य भवन, मुंबई येथे राज्य गुणवत्ता आश्वासन उपसमितीची बैठक सकाळी ११.०० वाजता आयोजित करण्यात आली होती. सदर बैठकीस खालील सदस्य उपस्थित होते.

१) डॉ. अर्चना पाटील, संचालक, आरोग्य सेवा, आरोग्य सेवा संचालनालय, पुणे
२) डॉ. रेखा डावर, प्राध्यापक व विभाग प्रमुख (सेवानिवृत्त), स्त्रीरोग व प्रसूतीशास्त्र विभाग, ग्रँट शासकीय वैद्यकीय महाविद्यालय व सर जे.जे. रुग्णालय समूह, मुंबई
३) डॉ. विनया आंबोरे, सहयोगी प्राध्यापक, शल्य चिकित्सा विभाग, ग्रँट शासकीय वैद्यकीय महाविद्यालय व सर जे.जे. रुग्णालय समूह, मुंबई
४) डॉ. दिगंबर तुळशिराम कानगुले, सहाय्यक संचालक, आरोग्य सेवा (कुटुंब कल्याण), रा.कु.क.का., पुणे

सदर बैठकीचे विषय पत्रिके वरील विषय खालील प्रमाणे होते.

(१) दिनांक २७.२.२०१९ रोजी झालेल्या गुणवत्ता आश्वासन उपसमितीच्या सभेचे इतिवृत्त कायम करणे.
(२) कुटुंब नियोजन नुकसान भरपाई योजने अंतर्गत सन २०१८-१९ व २०१९-२० मधील भौतिक व आर्थिक बाबींचा आढावा घेणे.
(३) सन २०१८-१९ व २०१९-२० मधील कुटुंब नियोजन शस्त्रक्रिये नंतर झालेल्या मृत्यू प्रकरणांचा आढावा घेणे.
(४) मा. अध्यक्षांच्या संमतीने ऐन वेळी उपस्थित होणा-या विषयांवर चर्चा करणे.

डॉ. दिगंबर कानगुले, सहाय्यक संचालक, आरोग्य सेवा (कु.क.) पुणे यांनी मा. अध्यक्षांचे व सर्व उपस्थित सदस्यांचे स्वागत केले. या सभेतील विषय सूचीनुसार विषयांची माहिती दिली. उपस्थित सदस्यांनी प्रत्येक विषयांस अनुसरुन आपली तांत्रिक व प्रशासकीय बाबीच्या संदर्भात मते मांडली. त्यानुसार काही महत्वाचे धोरणात्मक निर्णय बैठकीत घेण्यात आले. प्रत्येक विषयानुसार झालेली चर्चा, उपस्थित केलेले मुद्दे व घेण्यात आलेले निर्णय या विषयांचा कार्यवृत्तांत खालीलप्रमाणे आहे,

- दिनांक २७.०२.२०१९ रोजीच्या बैठकीचे ईतिवृत्त वाचून कायम करण्यांत आले.
- सन २०१३-१४ पासून कुटुंब नियोजन नुकसान भरपाई योजनेअंतर्गत लाभ द्यावयाच्या प्रलंबीत प्रकरणांवर चर्चा करण्यात आली व सन २०१३-१४ पासून प्रलंबित प्रकरणांबाबत त्वरित कार्यवाही करण्यात यावी, असा निर्णय घेण्यात आला.
- सन २०१८-१९ या आर्थिक वर्षामधील कुटुंब नियोजन शस्त्रक्रियेनंतर झालेली ६ मृत्यू प्रकरणे व सन २०१९-२० या आर्थिक वर्षामधील माहे जुन २०१९ पर्यंतची ५ प्रकरणे असे एकूण ११ मृत्यू प्रकरणांबाबत बैठकीमध्ये चर्चा करण्यांत आली. तज्ञांनी सर्व मृत्यू प्रकरणांचे पृथःकरण केले. यामध्ये शस्त्रक्रियापूर्वीची तपासणीमधील त्रुटी, शस्त्रक्रिया करतेवेळी झालेले दुर्लक्ष, पाठपुरावा करतेवेळी न घेतलेली काळजी इ. त्रुटींचे विश्लेषण केले.

सदर बैठकीमध्ये काही मुद्यांवर सखोल चर्चा करण्यांत आली व निर्णय घेण्यात आले, त्याबाबतचा तपशील खालीलप्रमाणे आहे,

| अ. क्र. | बैठकीमध्ये झालेला निर्णय | करावयाची कार्यवाही | अपेक्षित कालावधी | जबाबदार अधिकरी |
|---|---|---|---|---|
| १ | ●कुटुंब नियोजन नुकसान भरपाई योजनेअंतर्गत सन २०१३-१४ पासून लाभ द्यावयाच्या प्रलंबित प्रकरणांची जिल्हा निहाय स्थिती दर आठवडयाला होणाऱ्या व्हिडीओ कॉन्फरन्स दरम्यान आढावा घेण्याकरीता मा. आयुक्त, आरोग्य सेवा तथा अभियान संचालक, राष्ट्रीय आरोग्य अभियान, मुंबई यांना अवगत करावी. | ●प्रलंबित प्रकरणांची जिल्हा निहाय स्थिती व्हि.सी. दरम्यान आढावा घेण्याकरीता मा. आयुक्त, आरोग्य सेवा तथा अभियान संचालक, राष्ट्रीय आरोग्य अभियान, मुंबई यांना पाठविण्यात यावी. | ●त्वरीत | सहाय्यक संचालक (कु.क.) |
| | ●लाभ द्यावयाची प्रलंबीत प्रकरणे असलेल्या जिल्हयांना अर्धशासकीय पत्राद्वारे सूचित करण्यात यावे. | ●प्रलंबित प्रकरणांचा जलदगतीने निपटारा करण्याबाबत संबंधित जिल्हा आरोग्य अधिकारी यांना अर्धशासकीय पत्राद्वारे सूचित करण्यात यावे. | ● १५ दिवसात | सहाय्यक संचालक (कु.क.) |
| २ | ●राज्यस्तरावर राज्य गुणवत्ता आश्वासन उपसमिती अंतर्गत प्रसूती तज्ञांचा समावेश असलेली एक उपसमिती स्थापन करावी आणि सदर समितीची बैठक कुटुंब नियोजन शस्त्रक्रियदरम्यान किंवा शस्त्रक्रियेनंतर मृत्यू झाल्याचे समजताच पुढील १५ दिवसांच्या आत राज्यस्तरावर आयोजीत करण्यात यावी व सदर बैठकीला संबंधित जिल्हयांच्या जबाबदार अधिका-यांना मृत्यू प्रकरणाच्या संपूर्ण कागदपत्रांसह उपस्थित राहणेबाबत सूचना देण्यात याव्यात. | ●राज्यस्तरावर राज्य गुणवत्ता आश्वासन उपसमिती अंतर्गत प्रसूती तज्ञांचा समावेश असलेली एक उपसमिती स्थापन करावी. | १ महिना | सहाय्यक संचालक (कु.क.) |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| ३ | प्रथमतः सन २०१९-२० मधील माहे जुन २०१९ पर्यंत झालेल्या ५ मृत्यू प्रकरणांबाबत व तदनंतर सन २०१८-१९ मध्ये झालेल्या ६ मृत्यू प्रकरणांबाबत संबंधित जिल्हयांच्या जबाबदार अधिका-यांना सदर प्रकरणाच्या संपूर्ण कागदपत्रांसह तज्ञाच्या बैठकीस उपस्थित राहणेबाबत कळवावे व तज्ञ समितीमार्फत मृत्यूचे कारण व इतर निष्कर्ष अंतिम करावेत आणि राज्य गुणवत्ता आश्वासन उपसमितीच्या पुढील बैठकीत सादर करावेत. | समिती स्थापनेनंतर राज्यस्तरावर सदर समितीची बैठक आयोजित करुन प्रथमतः सन २०१९-२० मधील माहे जुन अखेरच्या ५ प्रकरणांचे व तदनंतर सन २०१८-१९ मधील ६ मृत्यू प्रकरणांचे समितीने अंतिम केलेले मृत्यूचे कारण व इतर निष्कर्ष राज्य गुणवत्ता आश्वासन उपसमितीच्या पुढील, बैठकीत सादर करावे. | राज्य गुणवत्ता आश्वासन उपसमितीची पुढील बैठक | सहाय्यक संचालक (कु.क.) |
| ४ | कुटुंब नियोजन शस्त्रक्रियेनंतर झालेल्या मृत्यू प्रकरणांबाबत राज्य गुणवत्ता आश्वासन उपसमितीसमोर सादर करावयाचा प्रकरणाचा गोषवारा नमुना सुधारित करुन त्या गोषवारा नमुन्यामध्येच सर्व मृत्यू प्रकरणे राज्य गुणवत्ता आश्वासन उपसमितीच्या पुढील होणाऱ्या बैठकांमध्ये सादर करण्यात यावे. | कुटुंब नियोजन शस्त्रक्रियेनंतर झालेल्या मृत्यू प्रकरणांबाबत राज्य गुणवत्ता आश्वासन उपसमितीसमोर सादर करावयाच्या प्रकरणाचा गोषवारा नमुना सुधारित करण्यात यावा. | राज्य गुणवत्ता आश्वासन उपसमितीची पुढील बैठक | सहाय्यक संचालक (कु.क.) |
| ५ | कुटुंब नियोजन सत्रात लाभार्थ्यांची शस्त्रक्रियेपुर्वी, शस्त्रक्रियेदरम्यान व शस्त्रक्रियेनंतर घ्यावयाच्या काळजीबाबतची चेकलिस्ट तयार करावी आणि सर्व जिल्हे व मनपा यांना ती चेकलिस्ट निर्गमीत करावी. जिल्हे/मनपा यांनी सदरची चेकलिस्ट आपल्या अधिनस्त सर्व संस्थांना निर्गमीत करावी व सदर चेकलिस्टनुसार कुटुंब नियोजन सत्रात लाभार्थ्यांची शस्त्रक्रियेपुर्वी, शस्त्रक्रियेदरम्यान व शस्त्रक्रियेनंतर काळजी घेण्यात येत असल्याबाबतची खात्री करण्याबाबत जिल्हे/मनपा यांना राज्यस्तरावरुन सुचना द्याव्यात. | कुटुंब नियोजन सत्रात लाभार्थ्यांची शस्त्रक्रियेपुर्वी, शस्त्रक्रियेदरम्यान व शस्त्रक्रियेनंतर घ्यावयाच्या काळजीबाबतची चेकलिस्ट तयार करुन सर्व जिल्हे व मनपा यांना परिपत्रकाव्दारे पाठविण्यात यावी व सदर चेकलिस्टचा वापर त्यांच्या अधिपत्याखालील सर्व संस्थांमार्फत करण्यात येईल याची दक्षता घेण्याबाबत सुचित करावे. | त्वरीत | सहाय्यक संचालक (कु.क.) |

डॉ. दिगंबर कानगुले, सहाय्यक संचालक, आरोग्य सेवा (कु.क.) पुणे यांनी अध्यक्षांचे व सर्व उपस्थित सदस्यांचे आभार मानले आणि अध्यक्षांच्या मान्यतेने बैठक समाप्त झाल्याचे घोषित केले.

**सदस्य सचिव**
राज्य गुणवत्ता आश्वासन उपसमिती
तथा
अतिरिक्त संचालक, आरोग्य सेवा
कुटुंब कल्याण, मा.बा.सं. व शा.आ. पुणे

**अध्यक्ष**
राज्य गुणवत्ता आश्वासन उपसमिती
तथा
आयुक्त, आरोग्य सेवा व अभियान संचालक,
राष्ट्रीय आरोग्य अभियान, महाराष्ट्र, मुंबई